**प्रेसनोट** दिनांक २३/०६/२०२१

**आरोपी १. जनार्धन नागोराव ताटे वय ५९ वर्षे, व्यवसाय वजने मापे दुरुस्ती परवाना धारक रा. सिकंदरपुर ता. जि. लातूर २. हणमंत शामराव कदम वय ५४ वर्षे, पद–शिपाई वर्ग–४, नेमणुक वनज व मापे विभाग औसा जि. लातूर या दोघांनी लाचेची मागणी करुन आरोपी कमांक १ यांनी शासकीय फी १०००/–रुपये व्यतिरीक्त ८००/– रुपयांची लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचे ३० किलो वजनाचा ईलेक्ट्रीक वनज काटा प्रमाणित करुन देण्यासाठी १,०००/–रुपये शासकीय फी व्यतिरीक्त १,०००/–रुपये लाचेची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक २३/०६/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक २३/०६/२०२१ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचे ३० किलो वजनाचा ईलेक्ट्रीक वनज काटा प्रमाणित करुन देण्यासाठी शासकीय फी १,०००/–रुपये व शासकीय फी व्यतिरीक्त आणखीन १,०००/–रुपये असे म्हणुन लाचेची मागणी करुन त्यांनी त्यांचा संबंधीत दुसरा कर्मचारी कदम यांना त्यांच्या फोनवरुन फोन करुन लाउडस्पीकर ऑन करुन तक्रारदार यांना बोलण्यासाठी दिला असता संबंधीत लोकसेवक हणमंत कदम, शिपाई यांनी फोनवरुन तक्रारदार यांचेकडे त्यांच्या वर नमुद कामासाठी शासकीय फी चे १,०००/–रुपये शासकीय फी व्यतिरीक्त आणखीन ८००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

सदर लाचेची रक्कम वजनमापे परवाना धारक जनार्धन ताटे यांना देण्यासाठी कासार बालकुंदा ग्रामपंचायत कार्यालया समोर तक्रारदार गेले असता वजनमापे परवाना धारक जनार्धन ताटे यांनी तक्रारदार यांचेकडुन शासकीय फी व्यतिरीक्त ८००/–रुपये लाचेची रक्कम १३.५१ वाजता स्वतः स्विकारली आहे म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

म्हणून तक्रारदार यांनी दोन्ही आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन कासार शिरसी येथे कलम ७, १२ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/रमाकांत चाटे, लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, पोना/मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारीहे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– मोबाईल कमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल कमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल कमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल कमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फी हेल्प लाईन कमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन कमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर